वाचन हे
ज्ञानाच्या
सागराचे
द्वार आहे

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | रविवार १५ जून २०२५ | अंक १७८ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# पंढरपुरात विठ्ठल भक्तांसाठी दर्शनासाठी नवीन प्रणाली, तिरुपती बालाजीप्रमाणे घरी बसून करा दर्शनाचा स्लॉट बुक



तिरुपती बालाजी मंदिराप्रमाणे दर्शनासाठी टोकन प्रणालीचा वापर पंढरपुरातील विठ्ठल मंदिरात करण्यात येणार आहे. इतिहासात पहिल्यांदाच टोकन दर्शन प्रणालीचा वापर विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात करण्यात येणार आहे. श्री विठ्ठल, रुक्मिणी मातेच्या टोकन दर्शन प्रणालीची चाचणी आजपासून सुरु करण्यात आली. या टोकन दर्शन प्रणालीचे संगणकीय काम टीसीएस ही कंपनी करणार आहे. टोकन दर्शनाच्या माध्यमातून दिवसभरातून बाराशे भाविकांची दर्शन व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांना घरी बसून ऑनलाईन प्रणालीच्या माध्यमातून दर्शनाचा स्लॉट बुक करता येणार आहे. तिरुपती बाजाली मंदिरात भाविकांना दर्शनासाठी टोकन दिले जातात. त्याच पद्धतीचा वापर पंढरपुरातील विठ्ठल रुक्मिणी मंदिरात करण्यात येणार आहे. टोकन घेतल्यावर दर्शन मंडपात दुसऱ्या मजल्यावर भाविकांची बसण्याची व्यवस्था केली आहे. ज्या ठिकाणी भाविकांसाठी बैठक व्यवस्था करण्यात आली त्या ठिकाणी सर्वच सोय उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. बैठक व्यवस्थितेत भाविकांना बसण्यासाठी त्याचबरोबर शौचालय, स्नान गृह, भाविकांना चहा, नाष्टा तसेच विठ्ठलाचे ऑनलाइन दर्शन देखील पाहता येणार आहे.

## दर्शनाचे सहा स्लॉट

भविकांचा दर्शनाचा पहिला स्लॉट सकाळी 9 ते 10 या वेळेत ठेवला आहे. या स्लॉटमधील 200 भाविकांना टोकन दर्शनासाठी सोडण्यात येणार आहे. दिवसभरातून टोकन दर्शनाचे सहा स्लॉट करण्यात आलेले आहेत. आषाढी यात्रेत गर्दीचे महत्त्वाचे तीन दिवस वगळून इतर वेळेला भाविकांना या टोकन दर्शनाचा लाभ घेता येणार आहे.

## असा करा स्लॉट बुक

टोकन दर्शन प्रणालीसाठी www.vitthalrukminimandir.org या संकेतस्थळावरुन बुकींग करावे लागणार आहे.टोकनवर वेळ दिली जाणार आहे. त्यावेळी भाविकाने श्री संत ज्ञानेश्वर दर्शन मंडपाच्या मागीस बाजूस उपस्थित राहावे. त्याठिकाणी टोकनची पडताळणी मंदिर समितीचे कर्मचारी करतील.पडताळणी प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भाविकास दर्शन हॉलमध्ये प्रवेश देण्यात येणार आहे.शेवटी दिलेल्या वेळेनुसार थेट दर्शन रांगेत प्रवेश होऊन भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन होईल

# अ.जा. अ.ज. प्रवर्गातील शेतकऱ्यांनी ठिबक तुषार घटकासाठी अर्ज करावेत

बीड । प्रतिनिधी राष्ट्रीय कृषी विकास योजना - प्रति थेंब अधिक पिक योजना अंतर्गत महाडीबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकरी बांधवांनी ठिबक, तुषार घटकासाठी अर्ज करावेत. असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी, बीड एस.एम.साळवे यांनी केले आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना- प्रति थेंब अधिक पिक योजनेतर्गत ठिबक/ तुषार घटकासाठी महाडीबीटी पोर्टलवर अनु.जाती व अनु.जमाती प्रवर्गातील शेतकऱ्याकरिता ९० टक्के पर्यंत अनुदान उपलब्ध आहे. या संधीचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा.अनुदानाची मर्यादा खालील प्रमाणे आहे.शेतकरी वर्गवारी, राष्ट्रीय कृषि विकास योजना- प्रति थेंब,अधिक पिक योजना, मुख्यमंत्री शाश्वत सिंचन



योजना,बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना, डॉ.बाबासाहेब कृषि स्वावलंबन योजना.अल्प व अत्यल्प भूधारक (२ हे.पर्यंत क्षेत्र ) ५५ टक्के, २५ टक्के, १० टक्के, ९० टक्के, बहु भूधारक (२ हे.पेक्षा जास्त क्षेत्र ) ४५ टक्के ३० टक्के १५ टक्के ९० टक्के.१.ठिंबक तुषार घटकामुळे उत्पादनात व उत्पादकतेत मोठ्या प्रमाणात वाढ होऊन आर्थिक स्तर २.पाण्याचा काटेकोर वापर झाल्याने तणांची वाढ रोखण्यास मदत होते.३.सिंचन क्षेत्रात वाढ होईल.

# उच्चशिक्षितांचेही लक्ष आता कारंजा टॉवर कडे!

### येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का - एस.एम.युसूफ़

बीड (प्रतिनिधी) - शहराची ओळख असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर कडे आता उच्चशिक्षितांचेही लक्ष जाऊ लागले आहे. नुकतेच येथे एका अभियंत्याचा वाढदिवस येथे साजरा करण्यात आला. येथे साजऱ्या होणाऱ्या वाढदिवसांनी या ऐतिहासिक वास्तूची दुरावस्था दूर होणार का असा प्रश्न या निमित्ताने मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

सन २०१४ सालापासून ऐतिहासिक कारंजा टॉवर ची दुर्दशा दूर करण्यात यावी याकरिता शासन-प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. याकरिता वेळोवेळी निवेदने देण्यात आलेली आहेत. प्रसिद्धी माध्यमातून लेख आणि बातम्या सुद्धा प्रकाशित करण्यात आलेल्या आहेत. तरीही जिल्हा प्रशासन असो की बीड नगर परिषद प्रशासन दोघांकडूनही ऐतिहासिक कारंजा टॉवरसाठी गेल्या अकरा वर्षात एकही काम करण्यात आलेले नाही. या ऐतिहासिक इमारतीच्या परिपूर्णतेसाठी आवश्यक



असलेली १४ कामे करण्याची यादी जिल्हाधिकारी आणि मुख्याधिकारी यांना देण्यात आलेली आहे. त्यापैकी 03 कामे कारंजा परिसरातील मिर्झा अब्दुल रऊफ़ बेग यांनी पुढाकार घेत इतरांना सोबत घेऊन केली आहेत. बाकीची ११ कामे अजूनही प्रतीक्षेतच आहेत. म्हणून वेळोवेळी याकडे दोन्ही प्रशासनाचे लक्ष वेधण्यात येत आहे. तरीही जिल्हा प्रशासन आणि बीड नगर परिषद प्रशासन इकडे लक्ष द्यायला तयार नाहीत. मात्र आता समाजातील उच्चशिक्षित लोकांचे लक्ष कारंजा टॉवर कडे जात असून ते टॉवर समोर येऊन आपले वाढदिवस साजरे करू लागले आहेत. अशाच प्रकारे नुकतेच येथे सचिन ठोंबरे या अभियंत्यांचा वाढदिवस दिगंबर मळगे, नवनाथ तपासे, बाबा पंडित, शिवाजी सुस्कर, अंकुश आगळे, गोविंद धांडे, अमोल कुमकर, नितीन धांडे, शंकरराव जगताप, डॉ. विक्रम सिंह कपूर, मुकुंद भालेकर, मधुकर धांडे, ऐतिहासिक कारंजा टॉवर साठी संघर्षरत असलेले ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे, गणेश तपासे, मन्यारवाडी चे सरपंच भिकू शिंदे, शेख लालू यांच्या उपस्थितीत साजरा करण्यात आला. यामुळे ऐतिहासिक कारंजा टॉवर चा सन्मान करत येथे साजरे करण्यात येणारे वाढदिवस या ऐतिहासिक वास्तूची दूर्दशा दूर करणार का असा प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी उपस्थित केला आहे.

# शेतकऱ्यांची कर्जमाफीसह विविध मागण्यांसाठी

## मा.बच्चु भाऊ कडु यांच्या अन्नत्याग आंदोलनाला लिंबागणेशकरांचा पाठिंबा :- डॉ.गणेश ढवळे

लिंबागणेश:-( दि.१४ ) शेतकऱ्यांना संपुर्ण कर्जमाफीसह , शेतीमालाला हमीभाव, शेतमजूर,दिव्यांग, ग्रामपंचायत कर्मचारी, विविध प्रश्नासंदर्भात प्रहार संघटनेचे अध्यक्ष बच्चु भाऊ कडु यांचे राष्ट्रसंतांच्या महासमाधीपुढे गुरूकुंज मोझरी येथे गेल्या ७ दिवसांपासून बेमुदत अन्नत्याग आंदोलन सुरू असुन बच्चु कडु यांनी उपस्थित केलेले प्रश्न हे कटु सत्य असुन शेतमालाला भाव नाही, राज्यात शेतकरी आत्महत्या मोठ्या प्रमाणात होत आहेत. सत्ताधा-यांनी निवडणुकीत दिलेले कर्जमाफीचे आश्वासन पाळले नाही.आर्थिक संकटात सापडलेला शेतकरी हताश होऊन टोकाचे पाऊल उचलुन आपले जीवन संपवत आहे. अवकाळी झालेल्या पावसामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई शेतकऱ्यांना मिळत नाही. जगाचा पोशिंदा बळीराजा आर्थिक



संकटात सापडला आहे. त्यामुळे मा.बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ आज दि.१४ शनिवार रोजी सकाळी लिंबागणेशकरांनी मुख्य प्रवेशद्वार याठिकाणी बच्चु भाऊ कडु यांच्या समर्थनार्थ व शेतकऱ्यांची कर्जमाफी झालीच पाहिजे ङ्क शेतीमालाला हमीभाव मिळालाच पाहिजे, सरकारचे धोरण हेच शेतकऱ्यांचे मरणङ्क अशी घोषणाबाजी करत निदर्शने करण्यात आली. शेतकरी कर्जमाफीसह प्रमुख मागणीसह ईतर मागण्या मान्य करून बच्चु भाऊ कडु यांच्या जिवीतास धोका असुन परिस्थिती चिघळण्या अगोदरच बेमुदत आमरण उपोषण सोडवण्याची मागणी करत बच्चु भाऊ कडु यांना ईमेल द्वारे आपला पाठिंबा दर्शविला आहे. निवेदन जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांना पाठवले आहे.यावेळी राजेभाऊ गिरे, भिम टायगर ग्रुपचे बीड जिल्हाध्यक्ष रविंद्र निमर्ळ, उपसरपंच बाळकृष्ण थोरात, ऑल इंडिया पँथर सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष नितिन सोनावणे, विक्रांत वाणी, रामकिसन गिरे, संतोष भोसले, सय्यद अख्तर, सुरेश निमर्ळ,आरूण निमर्ळ, राहुल जाधव, तुकाराम गायकवाड, रामदास मुळे, अर्जुन गोंडे,आश्रुबा गिरे, भगवान मोरे, रामकिसन गिरे,लहु घोलप, दत्ता घरत, तुषार गायकवाड,शहाजी वाणी, भालचंद्र गिरे,लहु घोलप आदी सहभागी होते.

डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर
मो.नं.८१८०९२७५७२

# चोभानिमगाव येथे वादळी वाऱ्यासह पावसाने डाळिंब बागेचे मोठं नुकसान



कडा (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील चोभा निमगाव येथे वादळी वाऱ्या सह जोरदार पाऊस झाल्याने शेतकऱ्यांचे डाळिंब बागेचे नुकसान झाले. चोभा निमगाव येथील शेतकरी रामलाल किसन थेटे या शेतकऱ्याने कर्ज उसनवारी करून चार वर्षांपूर्वी सहाशे डाळिंबाची झाडांची बाग फुलवली होती. परंतु या वादळीवाऱ्यासह जोरदार पाऊस झाल्याने सहाशे झाडा पैकी किमान दोनशे झाड पडले आहेत,या वर्षी त्यांनी अडीच तीन लाख रुपये खर्च करून झाड संगोपन केली होती ,चार वर्षापासून ते या झाडांना खर्च संगोपन करत आहेत. काल परवा झालेल्या पाऊसाने अनेक शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. लवकरात लवकर शेतकऱ्यांची या नुकसानीचे पंचनामे करून दखल घेऊन शेतकऱ्यांना योग्य मोबदला द्यावा. फळ बागेचे जितक्या प्रमाणात नुकसान झाले तितक्याच प्रमाणात मदत मिळावी. नुकसान लाखात मदत हजारात असे करू नका अशी मागणी येथील शेतकरी करत आहेत.

# आचार्य गणेश शास्त्री द्रविड यांनी राष्ट्रवादीचे नेते बबनराव गवते यांच्या निवासस्थानी भेट दिली.

बीड: श्री.क्षेत्र अयोध्या येथील राम मंदिराच्या प्राण प्रतिष्ठेचा शुभमुहूर्त काढणारे सुप्रसिध्द ज्योतिषाचार्य पद्मश्री आचार्य गणेश शास्त्री द्रविड यांनी राष्ट्रवादीचे नेते बबनराव गवते यांच्या निवासस्थानी भेट दिली. गवते परिवाराच्या वतीने त्यांचे बबनराव गवते यांनी स्वागत करून आशिर्वाद घेतले. यावेळी श्री क्षेत्र शिंपेगाव येथील ह.भ.प. हनुमान महाराज, गोवर्धन काशिद, पत्रकार संदीप लवांडे, गोविंद गवते, ज्ञानेश्वर गवते, सूरज गवते उपस्थित होते.



# जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केली बिंदुसरा तलावाची पाहणी



बीड (प्रतिनिधी) - बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी शहराच्या पाणीपुरवठ्याचा महत्त्वाचा स्रोत असलेल्या बिंदुसरा तलावाची पाहणी केली. जलव्यवस्थापनाची स्थिती जाणून घेतली. पाहणीदरम्यान जिल्हाधिकाऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. तलाव परिसरात स्वच्छता आणि सुरक्षा व्यवस्था सुधारावी. असे ते म्हणाले. या वेळी तहसीलदार चंद्रकांत शेळके, नायब तहसीलदार प्रशांत सुपेकर तसेच स्थानिक प्रशासनातील अधिकारी उपस्थित होते.

# आष्टी मतदारसंघात आ.सुरेश धस यांच्या प्रयत्नाने पंतप्रधान घरकुल आवास योजनेत १८ हजार घरकुल

आष्टी,पाटोदा,शिरूर कासार या तिन्ही तालुक्यात पंतप्रधान घरकुल आवास योजना ग्रामीण अंतर्गत २०२५-२६ करिता १८ हजार ७ लाभार्थ्यांना घरकुले मंजूर झाले आहेत. लाभार्थ्यांनी ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन करावेत या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे. पंतप्रधान घरकुल योजना अंतर्गत घरकुल मंजुरी प्रधानमंत्री आवास योजनेतील घरकुले मंजूर झाले असून मतदारसंघात ड घरकुल सर्वेक्षणाचे काम सुरू असताना ब सर्वेक्षण बाबत आ.सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री एकनाथ



शिंदे,उपमुख्यमंत्री अजित पवार भेट घेऊन लक्ष वेधल्याने लाभार्थीच्या घरकुल मंजुरी मध्ये लाभार्थ्यांचा जास्तीचा फायदा असून सर्वाधिक घरकले मंजूर केल्याबद्दल केंद्र सरकार व राज्य सरकारचे आ.सुरेश धस यांनी आभार मानले आहे.यामध्ये आष्टी ७३०२,पाटोदा ५९१५,शिरूर कासार ४७९० तिन्ही तालुक्यात एकूण १८ हजार ७ घरकुले मंजूर झाले असून त्या यादीतील लाभार्थ्यांना लाभ मिळणार आहे.यासाठी ग्रामपंचायतचा जागा उपलब्धेप्रमाणे पीटीआर किंवा सातबारा,आधार बँक पासबुक या आवश्यक कागदपत्राची पूर्तता संबंधित गावातील ग्रामसेवक किंवा ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांच्याकडे करावेत. घरकुल यादीत दिलेल्या लाभार्थ्यांनी नियमाप्रमाणे कागदपत्रे ऑनलाइन प्रणाली मार्फत करून घ्यावेत म्हणजे लाभार्थ्यांच्या खात्यात घरकुलाचा हप्ता वितरण जमा होण्यास सुलभ जाईल. आवश्यक त्या कागदपत्राची पूर्तता करून ऑनलाईन करावेत या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकःराहुल मारोतीराव वाईकर
रविवार १५ जून २०२५
https://lokaarambh.com


## संपादकीय

## ट्रम्प-मस्क दिलजमाई; दोघांच्या गरजेची

अमेरिकन अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि बिलेनियर उद्योगपती एलॉन मस्क यांच्यात मतभेद झाले आणि ते पेल्यातील वादळ ठरले. दोघांनीही काल समझोता केला आणि एक बिलेनियर उद्योगपती आणि अमेरिकन अध्यक्ष यांच्यातील समझोता अखेर अस्तित्वात आला. आता त्यांच्यात समझोता झाला आहे तेव्हा त्यांच्या संबंधांकडे पाहिले असता असे लक्षात येईल की, ट्रम्प यांना अमेरिकन अध्यक्षपदाच्या खुर्चीवर बसवण्यासाठी मस्कच जबाबदार होते आणि त्यांच्या पाठिंब्यामुळेच ट्र म्प अध्यक्षपदाच्या आसनावर विराजमान झाले. दुसऱ्या टर्मसाठी ट्रम्प जेव्हा तयारी करत होते तेव्हा बिलेनियर उद्योगपतींनी त्यांच्या विजयात महत्त्वाची भूमिका साकारली यात काही शंका नाही. जसे की, अध्यक्ष हॅरी ट्रुमन यांच्या निवडीत तेव्हाचे उद्योगपती ज्यांचे नाव अद्यापही गुलदस्त्यात आहे त्यांच्यामुळे ट्रुमन अध्यक्ष होऊ शकले. त्यानंतर आता ट्रम्प आणि मस्क यांच्यात असेच नाते आहे. अर्थात ट्रम्प आणि ट्रुमन यांच्यातील फरक लक्षणीय आहे. ट्रु मन इतके कधीही तिरस्करणीय नव्हते जितके ते ट्रम्प आहेत. पण ते असो. २०२४ मध्ये ट्रम्प आणि मस्क यांच्यातील नातेसंबंध यांचे अधोरेखित झाले होते जेव्हा मस्क यांनी ट्रम्प यांच्या मोहिमेत न भूतो न भविष्यती अशी भूमिका बजावली. तेव्हापासून ट्रम्प आणि मस्क यांच्यातील जवळीक वाढली आणि व्हाईट हाऊस यांच्यात तिचा बोलबाला झाला, पण या त्यांच्या संबंधात गेल्या आठवड्यापासून तणाव सुरू झाला आणि दोघांत संघर्षाचे खटके उडू लागले. जनतेतून टीका तर होतच होती, पण त्यानंतर दोघांत तीव्र खटका उडाला. गेल्या आठवड्यात ट्रम्प आणि मस्क यांच्यात भागीदारी होती, ती तणावपूर्ण होती आणि त्यामुळे ट्रम्प आणि मस्क यांच्यातील तणावाचे रूपांतर गेल्या आठवड्यात बाचाबाचीत झालेले पाहिले. ७८ वर्षीय ट्रम्प हे माझ्याशिवाय निवडणूक जिंकू शकले नसते अशी मल्लिनाथी मस्क यांनी केली, तर ट्रम्प हे पूर्ण कृतघ्न आहेत असा आरोप त्यानी जाहीररीत्या केला. एक जगप्रसिद्ध उद्योगपती आणि दुसरा अमेरिकेचा ताकदवान सर्वात मोठा शक्तीशाली अमेरिकन अध्यक्ष यांच्यातील या संघर्षाचे परिणती काय होणार यावर जग अंदाज लावत बसले. आता जग थोडे-फार सावरले असले तरीही या संघर्षाचा परिणाम चांगला होणार नाही हे दोघांनाही माहीत आहे. ट्रम्प यांनी मस्क यांच्यात अवाढव्य उद्योगजगताला धक्का लावण्याची धमकी दिली आहे आणि मस्क यांच्या काळजाचा ठोकाच त्यामुळे चुकला, त्याने कदाचित मस्क यांना आपली धमकी मागे घेऊन ट्रम्प यांच्याशी जुळवून घ्यावे लागले असावे. या भांडणाची अपरिहार्य परिणती म्हणजे ट्रम्प यांनी आपल्याकडील सरकारी वरदहस्त मस्क यांच्या कंपन्यांना काढून घेतला आणि परिणामी मस्क यांच्या टेस्लाच्या किमती १४ टक्क्यांनी गुरुवारीच कोसळल्या. अर्थात ही एकतर्फी घोषणा नव्हती, तर मस्क यांनीही मग ट्रम्प यांच्याविरोधात महाभियोग चालवण्याची धमकी दिली. या युद्धात मस्क हे युद्ध जिंकू शकणार नाहीत कदाचित पण ते ट्रम्प यांना धडा शिकवू शकतात आणि आपली किंमत वसूल करू शकतात. ट्रम्प यांना याची जाणीव असावी, पण त्यांनी अशी इच्छा व्यक्त केली की, मस्क यांनी आधीच आपले मंत्रिमंडळ सोडून जायला हवे होते, पण आता दोघांनाही आपापली चूक कळून आली आहे आणि त्यामुळे दोघांनीही आपल्या समशेरी म्यान केल्या आहेत. यात विजय कुणाचा झाला अथवा कुणाचा पराभव झाला हे ज्याच्या त्याच्या भूमिकेप्रमाणे ठरेल. ट्रम्प आणि मस्क यांनी शक्तीशाली पण अनौपचारिक, पण अशक्य वाटणारी आघाडी उघडली होती, आता ती पुन्हा मजबूत झाली आहे असे वाटते, पण हे किती दिवस चालेल याचा काहीच अंदाज नाही, कारण दोघेही अहंमन्य आणि अहंकारी नेते आहेत. त्यात दोघांचेही इगो आपसात टकराव देत असतात. त्यामुळे किती दिवस हे तात्पुरते पॅचअप चालेल हे काही सांगता येत नाही.

# खंडाळ्यात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले पेरणीचे प्रात्यक्षिक : जायभाय यांच्या शेतात केली सोयाबीनची पेरणी

## जिल्हाधिकाऱ्यांनी केली आस्थेवाईकपणे चौकशी : गावकरी भारावले





.बीड जिल्ह्यामध्ये सध्या पावसाचे चांगले वातावरण आहे . खरीप हंगाम ाच्या तोंडावरती चांगला पाऊस झाल्याने शेतकऱ्यांची पेरण्याची लगबग सुरु झालेली आहे . मे महिन्यामध्ये पाऊस पडल्याने व सध्याही पाऊस चालूच असल्याने काही ठिकाणी वाफसा स्थिती नाही , परंतु बऱ्याच ठिकाणी पेरण्या सुरु झालेल्या आहेत . या परिस्थितीत बीड जिल्ह्याचे लोकप्रिय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पेरणीची पद्धत कशी असते ही पाहण्याची इच्छा व्यक्त केली . या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे , तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी बीड तालुक्यातील खंडाळा या गावची निवड केली . नियोजनानुसार बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके व त्यांची टीम तसेच सुभाष साळवे व त्यांची कृषी विभागाची टीम खंडाळा या गावात पोहोचली . प्रारंभी सरपंच राजरतन जायभाय यांनी गावकऱ्यांतर्फे जिल्हाधिकारी यांचा छोटेखानी सत्कार केला . नंतर जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन सरळ शेतात गेले . बाबासाहेब जायभाय यांचे शेत निवडलेले होते . सध्या त्यांना सोयाबीन या पिकाची पेरणी करावयाची होती . महाडीबीटी प्रणालीवर ऑन लाईन अर्ज करून निवड झालेल्या शेतकऱ्यांना प्रमाणीत बियाणे कृषी विभागाकडून मिळालेले आहे . सदर बियाणे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरीने संशोधित केलेले - फूले किमया हे वाण आहे . यापूर्वीच उप कृषि अधिकारी राजेंद्र राऊत , सहाय्यक कृषी अधिकारी संतोष काशीद , बी टी एम जुबेर पठाण व अशोक काळे यांनी सदरील सोयाबीन बियाण्याला कार्बनडिझीम व थायोमिथाक्झाम यांची बीज प्रक्रिया कशी करावी व नंतर पि एस बी व रायझोबियम यांची बीज प्रक्रीया कशी करावी हे शेतकऱ्यांना समजावून सांगितले होते . जिल्हाधिकारी शेतात आल्यानंतर त्यांनी शेतकऱ्यांना काही प्रश्न विचारले - जसे की आपल्या भागातील मुख्य पीक कुठले आहे ? यावर शेतकऱ्यांनी सोयाबीन हेच मुख्य पीक असल्याचे सांगितले . त्यानंतर ओलिताच्या सिंचन सुविधांच्या वापराविषयी विचारले असता शेतकऱ्यांनी सांगितले की या ठिकाणी पाणी मुबलक आहे . परंतु ते देण्याची व्यवस्था पुरेशी नाही . जिल्हाधिकारी महोदयांनी सदर शेतकऱ्यांना महावितरण विभागाच्या कुसुम योजने अंतर्गत सोलार पंप बसवण्याचा सल्ला दिला . यानंतरही जर शेतकऱ्यांच्या काही अडचणी असतील तर त्या माझ्याशी संपर्क साधा असे आवाहन केले . गावातील मुख्य व्यवसाय शेती व्यतिरिक्त इतर व्यवसायाबद्दल विचारले असता सहायक कृषि अधिकारी संतोष काशीद यांनी दुग्ध व्यवसायासोबतच कांदा पीकावर शेतकऱ्यांचे उत्पन्नाचा स्त्रोत असल्याचे सांगितले . शेतकरी बाबासाहेब जायभाय यांचे बैलजोडी व पेरणी यंत्र तयार होते . जिल्हाधिकारी यांनी स्वतः हातामध्ये बैलाचा कासरा घेऊन व दुसऱ्या हातामध्ये बियाणे घेऊन बैलचलीत पेरणी यंत्रावर स्वतः पेरणी चालू केली . नंतर ते जवळपास अर्धातास जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांच्यासह शेतामध्ये पेरणी करण्यात रंगले होते . यानंतर श्री सुभाष साळवे यांनी टोकन यंत्राचा वापर कशा पद्धतीने वाढला पाहिजे , कृषि विभाग कशा प्रकारे टोकन यंत्रास प्रोत्साहीत करत आहे याविषयी जिल्हाधिकारी यांना माहिती देऊन गावकऱ्यांशी चर्चा केली व टोकण यंत्राचा प्रत्यक्ष वापर कसा करावा याचे एक प्रात्यक्षिक घेण्याची जिल्हाधिकारी यांना विनंती केली . टोकन यंत्राविषयी व केलेल्या बीजप्रक्रिया विषयी उप कृषि अधिकारी राजेंद्र राऊत यांनी जिल्हाधिकारी यांना माहिती सांगितली . या टोकन यंत्रावर देखील स्वतः जिल्हाधिकारी यांनी पेरणी करून पाहिली . शेती करताना येणाऱ्या अडीअडचणी याविषयी उपस्थित असलेल्या शेतकऱ्यांसमवेत चर्चा करून समजावून घेतल्या . त्या सोडवण्याविषयी चर्चा देखील केली . पुढे बोलताना जिल्हाधिकारी म्हटले की सर्वांनी फार्मर आयडी काढणे आवश्यक आहे , जिवंत सातबारा मोहिमे अंतर्गत आवश्यक त्या दुरुस्त्या करून घ्याव्यात . तसेच महसूल विभागाची कोणतीही कामे असल्यास माझ्याशी अथवा संबंधित तहसीलदार यांच्याशी सरळ संपर्क साधावा असे आवाहन केले . कृषी विभागातील वेगवेगळ्या योजना कशा पद्धतीने राबवल्या जात आहेत याविषयी कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी माहिती दिली . यानंतर जिल्हाधिकारी यांनी गावातील प्रतिष्ठित शेतकरी व सरपंच यांनी केलेल्या तक्रारीनुसार चालत जाऊन गावातील विजेचे खांब व तारेची स्वतः पाहणी केली व यावर उपाययोजना करण्यासाठी ठोस पाऊल उचलण्याचे आश्वासन दिले . यावेळी जिल्हाधिकारी यांनी कृषी विभागाच्या वतीने बियाणे ,खते यांचे योग्य नियोजन व्हावे व योग्य सल्ला गावागावात पोहोचावा अशी अपेक्षा व्यक्त केली . जिल्हाधिकारी महोदयांच्या या सकारात्मक भूमिकेमुळे गावकऱ्यांमध्ये नवचैतन्य पहावयास मि ळाले . याप्रसंगी बीड तालुक्याचे लोकप्रिय तहसीलदार चंद्रकांत शेळके , मंडळ अधिकारी शीतल चाटे , तलाठी रेश्मा तानगे , उप कृषि अधिकारी राजेंद्र राऊत , सहाय्यक कृषी अधिकारी संतोष काशीद , बी टी एम जुबेर पठाण , अशोक काळे , सरपंच राजरतन जायभाय , शेतकरी बाबासाहेब जायभाये , ग्रामपंचायत सदस्य किरण केकान , अशोक चौरे , सुदाम जायभाय , त्रिंबक केकान ,भास्कर जायभाय , भीमराव चौरे , तुकाराम जायभाय , शिवाजी जायभाय , रजनीकांत केकान , अरुण चौरे , आबा केकान , रामा जायभाय , बाबुराव जायभाय ,सुभाष जायभाय , आदिनाथ चौरे , ज्ञानेश्वर चौरे , महाधन जायभाय सुजित जायभाय , बयजी गीते , आश्रुबा जायभय , रंगनाथ जायभाय , सुभाष चौरे , सुरज चौरे , दिगंबर चौरे , विश्वंभर चौरे , फुलचंद जायभाय ,जालिंदर जायभाय ,भरत जायभाये ,आप्पा पाटील चौरे व गावातील प्रतिष्ठित शेतकरी मोठ्या प्रम ाणात उपस्थित होते . .

# तलाठी, मंडळ अधिकाऱ्यांच्या त्वरित बदल्या करा-भाई नारायण गोले

माजलगाव । प्रतिनिधी तालुक्यात काही तलाठी, मंडळाधिकारी हे अनेक दिवसांपासून माजलगाव तालुक्यात ठाण मांडू न बसलेले आहेत त्यामुळे त्यांना तालुक्यातील इतंबूत माहिती झाली असून ते सज्ञावर जात नाहीत अथवा शेतकऱ्यांचे फोन देखील घेत नाहीत तसेच माजलगाव शहरात खाजगी कार्यालये थाटुन खाजगी व्यक्तीच्या ताब्यात शासकीय दस्तऐवज देऊन आपल्या कर्तव्यात कसूर करुन खाजगी व्यक्तीच्या माध्यमातून प्रचंड माया जमवत आहेत या बाबत वरिष्ठांकडे शेतकरी कामगार पक्षाने अनेक तक्रारी करून देखील केवळ वरिष्ठाची मर्जी सांभाळत असल्याने त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही केली जात नाही, याशिवाय काही तलाठी मंडळ अधिकारी तर तहसीलदार व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाळू,मुरूम यासह विविध कामात पैसे गोळा करून देतात, त्यामुळे वरिष्ठ त्यांची बदली करायला धजत नाहीत उलट पक्षी त्यांची बदली होऊ नये यासाठी सातत्याने प्रयत्न करत असतात, तसेच शेतकऱ्यांना शुल्लक शुल्लक कामासाठी अनेक खाजगी कार्यालयाचे उंबरठे झिजवायला भाग पाडतात त्यामुळे शेतकरी देखील तलाठी मंडळ अधिकाऱ्याच्या जाचाला कंटाळले आहेत म्हणून गेल्या अनेक वर्षापासून माजलगाव येथे कार्यरत असलेले मंडळ अधिकारी तलाठी यांच्या बदल्या करणे कामी माजलगाव येथील उपविभागीय अधिकारी गौरव इंगोले यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाचे वतीने निवेदनाद्वारे मागणी केली असून बदल्या न केल्यास तिव्र आंदोलन करण्याचा इशाराही शेतकरी कामगार पक्षाचे वतीने दिला असून निवेदनावर शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई अॅड.नारायण गोले पाटील,भाई श्रीराम शेवाळे,भाई श्रीराम कोरडे,भाई मुंजा पांचाळ,भाई लक्ष्मण आप्पा चव्हाण,भाई भास्कर कांबळे, भाई चांगदेव शेजुळ,भाई साळुजी हांडे,भाई कडाजी नावडकर आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# मातंग समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा डीपीआय पक्षातर्फे गौरव







बीड । प्रतिनिधी मातंग समाजातील आर्थिक दृष्ट्या दुर्बल पण शैक्षणिकदृष्ट्या उजळ कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी स्मृतीशेष आत्मारामजी चांदणे साहेब यांच्या जन्मदिनानिमित्त डीपीआय पक्षाच्या वतीने एक विशेष सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले. शहरातील हॉटेल नीलकमल येथे भरलेल्या या कार्यक्रमात शेकडो विद्यार्थी, पालक आणि समाजबांधवांनी उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमामध्ये दहावी, बारावी तसेच पदवी स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना हार,शाल, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या गौरवाने संपूर्ण सभागृहात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. कार्यक्रमाचे आयोजन डीपीआय पक्षाचे जिल्हाध्यक्ष सुनील पाटोळे आणि कार्यकर्ते बाळासाहेब पोळ यांच्या पुढाकाराने करण्यात आले. आजच्या या उपक्रमाचा उद्देश केवळ सत्कार नव्हे, तर विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवणे, त्यांना योग्य दिशा देणे आणि समाजातील इतर विद्यार्थ्यांमध्येही शिक्षणाबाबत जागरूकता निर्माण करणे हा आहे. मातंग समाजातील अत्यंत आर्थिक दुर्बल घटकातील दहा गुणवंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाच्या खर्चाची जबाबदारी डीपीआय पक्ष घेणार आहे. या निर्णयाने उपस्थित पालक आणि समाजबांधवांमध्ये आनंद आणि आश्वासकता पसरली. मातंग समाजामध्ये अजूनही शिक्षणाचे प्रमाण कमी आहे. विद्यार्थ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार मनात बाळगून शिक्षणाच्या वाटेवर पुढे जावे. आयएएस, आयपीएस होण्याची स्वप्ने बाळगावीत. आपल्या समाजाला शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणायचे असेल तर आपण सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे. असे वक्तव्य जिल्हाध्यक्ष सुनील पाटोळे यांनी यावेळी केले. कार्यक्रमास अनेक मान्यवर पाहुणे, शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि शिक्षक उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणातील महत्त्व, ध्येय निश्चिती आणि चिकाटी याबद्दल मार्गदर्शन केले. त्यांच्या विचारांनी उपस्थितांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. या कार्यक्रमामुळे आत्माराम जी चांदणे यांना अभिप्रेत असणाऱ्या मातंग समाजातील विद्यार्थ्यांना केवळ सन्मान मिळालेला नाही, तर त्यांच्या पुढील वाटचालीसाठी मानसिक बळ देखील मिळाले आहे. शिक्षण क्षेत्रात अधिक प्रगती करण्यासाठी समाजातील सर्व स्तरांतील व्यक्तींनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांना आधार देण्याची गरज आहे, हेच या कार्यक्रमातून अधोरेखित झाले.उपस्थित मान्यवर:- अध्यक्ष अजिंक्य भैय्या चांदणे, तर उद्घाटक उपजिल्हाधिकारी शैलेश सूर्यवंशी,तुलशी संगणक महाविद्यालयाचे सर्वेसर्वा प्रदीपजी रोडे सर, उत्तमजी पवार, प्रा.शिवराज बांगर अशोक बप्पा सोनवणे,बळीराम चांदणे.आयोजक सुनिल पाटोळे, बाळासाहेब पोळ. संयोजन समिती:- नितीन धुताडमल,अमोल मैंदेकर,सचिन धुरंधरे, आकाश धूताडमल, ज्ञानदेव लोंढे बबन थोरात अभिषेक मुजमुले

## कै.व्यंकटराव शिंदे यांचे निधन



नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट

नांदेड : लोहा तालुक्यातील जोमेगाव येथील ज्येष्ठ नागरिक कै.व्यंकटराव शामराव पाटील शिंदे माळकौठकर वय वर्षे ७५ यांचे वृद्धापकाळाने दि.१४-जून रोजी दुपारी ३ वाजता निधन झाले असून त्यांच्या पार्थिवावर दि.१५-जून रोजी दुपारी १ वाजता जोमेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. कै.व्यंकटराव शामराव पाटील शिंदे माळकौठकर त्यांच्या पश्चात पत्नी दोन मुले चार मुली सुना नातू असा मोठा परिवार आहे. भाजपा तालुका उपाध्यक्ष प्रभाकर शिंदे पत्रकार बाळासाहेब शिंदे यांचे वडील तर सहशिक्षक आर.एम.शिंदे यांचे ते मेहुणे होत.

## वाशिम येथे BARTI पोलीस भरती प्रशिक्षण बॅचचा निरोप समारंभ उत्साहात संपन्न



प्रतिनिधी / पठाण सर, वाशिम : बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती प्रवर्गीय शिक्षण व प्रशिक्षण संस्था (BARTI), पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि हितोपदेशक बहुउद्देशीय संस्था, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण बॅचचे आयोजन करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना पोलीस भरती परीक्षेसाठी आवश्यक असलेल्या अंकगणित, मराठी व्याकरण, बुद्धिमत्ता चाचणी, सामान्यज्ञान व मैदानी चाचणी या सर्व विषयांचे सखोल प्रशिक्षण देण्यात आले. अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ खेळकर व आनंदी वातावरणात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी हितोपदेशक बहुउद्देशीय संस्थेचे सचिव प्रा. निलेश माळी सर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. अनिल मानेकर यांनी केले. प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. इस्माईल खान पठाण यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, अभ्यासपद्धती आणि करिअरच्या संधी याविषयी मार्गदर्शन करून उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी काही विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत संस्थेचे व प्रशिक्षकांचे आभार मानले. शेवटी प्रा. अजय मैंनकर यांनी आभार प्रदर्शन करून कार्यक्रमाचा समारोप केला. संस्थेच्या या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी दर्जेदार मार्गदर्शन व प्रेरणा मिळाली असून, भविष्यात हे विद्यार्थी यशस्वी अधिकारी म्हणून घडतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## आचार्य अत्रे हे साहित्य क्षेत्रातील बहुआयामी व अष्टपैलू व्यक्तिमत्त्व --प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळ



प्रतिनिधी पाचोड पाचोड दि. 13 : कवी म्हणून केशवकुमार या टोपणनावाने प्रख्यात असलेले आचार्य प्रल्हाद केशव अत्रे हे मराठीतील नावाजलेले लेखक, कवी, नाटककार, संपादक, चित्रपट निर्माते, शिक्षणतज्ज्ञ, राजकारणी व वक्ते असे साहित्य क्षेत्रातील बहुआयामी आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते असे गौरवोद्गार प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी काढले. पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयात संयुक्त महाराष्ट्र चळवळीत महत्त्वपूर्ण योगदान देणारे प्र. के. अत्रे यांच्या पुण्यतिथीनिमित्त (दि.13) एका कार्यक्रमात प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे बोलत होते.

पुढे बोलताना प्राचार्य डॉ. कोठावळे म्हणाले की, आचार्य अत्रे हे एक प्रसिद्ध लेखक होते. त्यांनी 'झेंडूची फुले' हा विडंबन काव्यसंग्रह लिहिला, जो 'केशवकुमार' या टोपणनावाने प्रसिद्ध आहे. तसेच, त्यांचे 'कऱ्हेचे पाणी' हे आत्मचरित्र प्रसिद्ध आहे.

प्रारंभी आचार्य प्रल्हाद केशव अत्रे यांच्या प्रतिमेला मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी डॉ. विठ्ठल देखणे, वैभव राऊत व मुरलीधर झिने आदी उपस्थित होते.

## विदर्भ गौरव पुरस्काराने निसर्गप्रेमी सुमित राठोड सन्मानित

प्रतिनिधी प्रांजली प्रविण काळबेंडे नागपूर दि.१४ जुन २०२५ निसर्ग प्रेमी कविवर्य पक्षीप्रेमी पोलीस अंमलदार सुमित राठोड यांना सहपत्नी सौ.सपना राठोड व कन्या काव्या राठोड यांच्या पर्यावरण कार्याची दखल घेत विदर्भ गौरव पुरस्कार -२०२५ देऊन त्यांना सन्मानित करण्यात आले आहे आहेत वीर शिव छत्रपती संघटना व एस आर एन फिल्मस प्रोडक्शन व न्युज इंडिया २४ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विदर्भ गौरव पुरस्कार सोहळा २०२५ नागपूरात दि.१४ जुन २०२५ ला कविवर्य सुरेशभट्ट सभागृहात दिमाखदार सोहळ्यात पार पडले या या कार्यक्रमात प्रमुख अतिथी श्रीमंत राजे मुधोजी भोसले महाराजा ऑफ नागपूर,श्री अशोक जी बागुल डी वाया एस पी नागपूर शहर आदी उपस्थित होते तसेच सुमित राठोड यांना सुद्धा प्रमुख अतिथी म्हणून बोलाविण्यात आले होते स्या सोबत महाराष्ट्रातील सिनेक्षेत्रातील ,कला ,साहीत्य शिक्षण क्षेत्रातील व संपुर्ण महाराष्ट्रातील विविध क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित होते या कार्यक्रमाचे आयोजक श्रीमंती शितल नंदनवार मॅडम सिनेअभिनेत्री व न्युज इंडिया-२४ इंडीटर ,श्री सागर निकम सर सिनेअभिनेते , दिग्दर्शक सोनी मराठी, झी मराठी,जिवा शिवा ,श्रीमंती दिक्षा देशमुख मॅडम प्राटेकशन मॅनेजर एस आर एन फिल्मस प्रोडक्शन यांच्या कडुन संयुक्त विद्यमाने आयोजन करण्यात



आले होते सुमित राठोड हे नागपूर येथे राखीव पोलीस बलात कार्यरत असुन पर्यावरण व पक्षी संरक्षण संवर्धन संगोपन करिता मागील सहा ते सात वर्षांपासून कार्य करीता आहेत आजवर त्यांनी हजारो वृक्ष लागवड सह भेट दिल्या आहेत लाखो बीया त्यांनी संकलन केल्या आहेत या शिवाय एक रोप वाटीका सुध्दा तयार केली आहे त्यांच्या या कार्याचा आढावा स्वतः सिनेअभिनेते दिग्दर्शक श्री सागर निकम सर नागपूर यांनी त्यांची रोप वाटीका व बीज बँक ची पाहणी केली आहे त्यांच्या या कार्याची दखल घेत त्यांना विदर्भ गौरव पुरस्कार २०२५ देऊन सन्मानित करण्यात आले आहे दि.१४ जून ला कवीवर्य सुरेशभट्ट नागपूर सभागृहात सुमित राठोड यांना विविध मान्यवर यांच्या उपस्थितीत पुरस्कार प्रदान करण्यात आले विशेष म्हणजे या कार्यक्रमात सहभागी सर्व अतिथी यांना सुमित राठोड यांच्या कडुन पुज्यनिय औषधी गुणकारी चोवीस तास प्राणवायू देणारी तुळशीचे रोप भेट देण्यात आले सुमित राठोड यांनी सर्व आजोजक यांचे मनापासून आभार व्यक्त केले आहे.

## मृग बहार 2025 फळपीक विमा योजना सुरु – शेतकऱ्यांनी अंतिम दिनांकापूर्वी अर्ज सादर करावा

प्रतिनिधी, पाचोड: शेतकऱ्यांसाठी दिलासादायक अशी फळपीक विमा योजना मृग बहार २०२५ साठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. हवामानातील अनिश्चितता, कमी-जास्त पाऊस, खंडित पावसाळा व वाढती आर्द्रता यांसारख्या घटकांमुळे पिकाचे नुकसान झाल्यास या योजनेद्वारे आर्थिक मदत मिळणार आहे. यामध्ये भाग घेण्यासाठी पिकानुसार अंतिम दिनांक पुढीलप्रमाणे आहेत: लिंबू,




द्राक्ष, पेरू, संत्रा: १४ जून मोसंबी, चिकू: ३० जून डाळिंब: १४ जुलै सीताफळ: ३१ जुलै अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे: Agristack नोंदणी क्रमांक आधार कार्ड बँक पासबुक (छायांकित प्रतीसह) जमीन धारणा उतारा (७/१२ उतारा) Geo-tag फोटो (पिकासह) महत्वाची अट: ई-पिक पाहणी नोंदणी बंधनकारक आहे. जर ई-पिक पाहणीची नोंद नसेल, तर शेतकऱ्याचा पिक विमा अर्ज रद्द होऊ शकतो. पिक विम्यात सहभागी झाल्यानंतर ई-पिक नोंदणी जुलै-ऑगस्ट २०२५ मध्ये करता येईल. विमा अर्जासाठी संपर्क करा: राजविर मल्टीसर्व्हिसेस CSC सेंटर, कोळी बोडखा ता. पैठण येथे शेतकऱ्यांना पिक विमा अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध आहे. इच्छुक शेतकऱ्यांनी अंतिम दिनांक लक्षात घेऊन वेळेत अर्ज सादर करावा.

# 'चहावाली' निघाली ऑक्सफर्ड पदवीधर; राजघराण्याची राजकन्या आणि यशस्वी उद्योजिका

प्रतिनिधी: मराठी चित्रपटसृष्टीतील वास्तववादी कथानकासाठी ओळखला जाणारा 'मुळशी पॅटर्न' चित्रपट प्रेक्षकांच्या मनात आजही घट्ट घर करून आहे. या चित्रपटातील एक छोटीशी, पण लक्षवेधी भूमिका साकारणारी 'चहावाली' पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. ही भूमिका साकारणारी अभिनेत्री मालविका गायकवाड हिने अलीकडेच ऑक्सफर्ड विद्यापीठ (इंग्लंड) येथून पदवी प्राप्त करून एक नवा मान मिळवला आहे. चित्रपटातील साधी भूमिका... पण



प्रेक्षकांच्या मनात ठसली 'मुळशी पॅटर्न' या सिनेमात मालविकाने एका चहावाल्या मुलीची भूमिका साकारली होती. तिची ही भूमिका फार मोठी नव्हती, मात्र तिच्या सहजसुंदर अभिनयामुळे प्रेक्षकांच्या मनात ती खोलवर ठसली. हा मालविकाचा पहिलाच आणि शेवटचा चित्रपट ठरला. थेट राजघराण्याची राजकन्या मालविका ही बडोद्याच्या गायकवाड राजघराण्याची राजकन्या आहे. पुण्यातील सिंहगड इन्स्टिट्यूट मधून तिने इंजिनिअरिंगचे शिक्षण घेतले आणि त्याच काळात तिला 'मुळशी पॅटर्न'साठी ऑडिशनला बोलावण्यात आले. अभिनयानंतर तिचे लग्न सिद्धार्थ सिंघवी यांच्यासोबत झाले आणि तिने शिक्षणासाठी इंग्लंड गाठले. व्यवसायातही मिळवले यश मालविकाने अभिनय आणि शिक्षणाबरोबरच व्यवसाय क्षेत्रातही आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सेंद्रिय शेती आणि शाश्वत जीवनशैलीसाठी तिने 'द ऑरगॅनिक कार्बन' नावाची कंपनी स्थापन केली आहे. याअंतर्गत 'हंपी A2' या ब्रँडने सेंद्रिय दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची विक्री सुरू केली आहे. साध्या 'चहावाली'पासून ऑक्सफर्ड पदवीधर, राजघराण्याची कन्या ते यशस्वी उद्योजिका असा मालविकाचा प्रवास निश्चितच प्रेरणादायी आहे.

## प्राचार्य चंद्रसेन कोठावळे यांना मराठवाडाभूषण पुरस्कार जाहीर

पाचोड, दि.१४: महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्यावतीने शिक्षण क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल येथील शिवछत्रपती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.चंद्रसेन पांडुरंग कोठावळे यांना मराठवाडाभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

या संघाचे रौप्य महोत्सवी अधिवेशन व पुरस्कार वितरण समारंभ आज रविवारी (दि.१५) सकाळी दहा वाजता संत एकनाथ रंगमंदिर येथे होत आहे. राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा पालकमंत्री मा.ना. संजय शिरसाठ यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात येईल. यावेळी बहुजन कल्याण विकासमंत्री मा. ना. अतुल सावे यांच्यासह मान्यवर उपस्थित राहणार आहेत. प्राचार्य डॉ. कोठावळे हे गेल्या चार दशकांपासून



शैक्षणिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत आहेत. ते सध्या पैठण तालुक्यातील पाचोडच्या शिवछत्रपती महाविद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. या महाविद्यालयास पीएम उषा प्रकल्पांतर्गत पाच कोटींचे निधी मिळून देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या योगदानाची दखल घेऊन पत्रकार संघाने हा पुरस्कार जाहीर केला आहे, असे विभागीय अध्यक्ष अनिल सावंत व जिल्हाध्यक्ष छबुराव ताके यांनी कळविले आहे. दरम्यान, हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल खासदार संदिपान भुमरे व आमदार विलास भुमरे, पैठण कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती राजूनाना भुमरे तसेच पाचोडचे युवा सरपंच शिवराज भुमरे यांनी प्राचार्य डॉ. कोठावळे यांचे अभिनंदन

## जागतिक रक्तदान दिन: "रक्तदान, जीवनदान" या संकल्पनेला उजाळा

### शहरातील विविध ठिकाणी रक्तदान शिबिरांचे आयोजन; युवक-युवतींचा उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी – जागतिक रक्तदान दिनानिमित्त आज संपूर्ण देशभरात आणि शहरात विविध सामाजिक संस्था, रुग्णालये व स्वयंसेवी संघटनांच्या वतीने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यात आले. "रक्तदान, जीवनदान" या संकल्पनेला अनुसरून लोकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. शहरातील प्रमुख भागांमध्ये – जिल्हा रुग्णालय, शासकीय महाविद्यालय, आणि शहरी आरोग्य केंद्रात एकत्रितपणे १५ हून अधिक शिबिरे भरविण्यात आली. यामध्ये सुमारे ८५० पेक्षा अधिक नागरिकांनी रक्तदान करून आपले सामाजिक कर्तव्य बजावले. स्थानिक महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांचा सहभाग विशेष उल्लेखनीय होता. युवा वर्गाने "एक थेंब रक्ताचे, हजारो आशा




जिवंत ठेवतो" या घोषवाक्याखाली रॅली काढत जनजागृतीही केली. या प्रसंगी आयोजित कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. स्नेहलता पाटील म्हणाल्या, "रक्त हे अजूनही मानवद्वारे निर्माण करता येत नाही. त्यामुळे नियमित रक्तदात्यांची संख्या वाढविणे ही काळाची गरज आहे." शहरातील काही नामवंत व्यक्तींनीही रक्तदान करून इतरांना प्रेरणा दिली. दरवर्षी १४ जून रोजी जागतिक रक्तदान दिन साजरा केला जातो. हा दिवस नोबेल पारितोषिक विजेते डॉ. कार्ल लँडस्टायनर यांच्या जन्मदिनी साजरा केला जातो, जे रक्तगटांचा शोध लावणारे शास्त्रज्ञ होते. रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत आजचा दिवस एका सामाजिक एकतेचा आणि मानवतेचा संदेश देणारा ठरला.

# पत्रकारांच्या प्रलंबित प्रश्नांसाठी निवेदन; जिल्हा माहिती अधिकाऱ्यामार्फत माहिती संचालकांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत सूचनांचे निवेदन

बीड /प्रतिनिधी मराठी पत्रकार परिषद बीड जिल्हा शाखेच्या वतीने बीड जिल्हा माहिती अधिकारी प्रशांत दैठणकर यांच्यामार्फत माहिती व जनसंपर्क विभाग मंत्रालय मुंबईचे संचालक डॉ. गणेश मुळे यांना पत्रकारांसाठीच्या योजनांच्या नियमात सुधारणा करणे बाबत निवेदन देण्यात आले या निवेदनात पत्रकारांच्या योजनांसाठी असलेल्या जाचक अटी काढून टाकाव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. मराठी पत्रकार परिषद गेल्या अनेक दिवसापासून पत्रकारांसाठीच्या विविध योजनांच्या आटी आणि नियमात बदल करावेत अशी मागणी सातत्याने करत आहे. या मागणीची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेऊन यात काही सुधारणा करण्याची तयारी दाखवली आहे. यात काय बदल अपेक्षित आहेत. अशा सूचना करणारे निवेदन जिल्हा माहिती अधिकाऱ्यांच्या मार्फत संचालक डॉ. गणेश मुळे यांना देण्यात आले या निवेदनामध्ये आचार्य बाळशास्त्री जांभेकर ज्येष्ठ पत्रकार सन्मान योजनेसाठी वयाची अट ५८ वर्ष व अनुभवाची अट २५ वर्षे करावी. सलग तीस वर्षे सेवा ही अट रद्द केली जावी. ज्यांच्याकडे विना खंड सलग तीस वर्षे अधिस्वीकृती पत्रिका आहे आणि ज्यांचे वय ५८ वर्ष आहे अशा पत्रकाराला सन्मान योजनेचा लाभ दिला जावा. महाराष्ट्रात असंख्य पत्रकार असे आहेत की त्यांच्याकडे तीस वर्षांपूर्वीची कागदपत्रे मिळत नाहीत. त्यामुळे पत्रकार योजना पासून ते वंचित राहतात. अशा स्थितीत जिल्हा माहिती अधिकारी आणि जिल्हा मराठी पत्रकार संघाचे शिफारस पत्र ग्राह्य समजले जावे. शिवाय संबंधित पत्रकाराचे प्रतिज्ञापत्र घेतले जावे. अनेक साप्ताहिकाच्या प्रेस लाईन वर मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक म्हणून एकाच व्यक्तीचे नाव असते मुद्रक अथवा प्रकाशक म्हणून नाव आहे म्हणजे तो पत्रकार अन्य व्यवसाय करतो असे नाही. ते फक्त सोयीसाठी असते. त्यामुळे प्रकाशक आणि मुद्रक म्हणून नाव असणाऱ्यांचा तो अन्य व्यवसाय आहे असे समजू नये त्यालाही लाभ मिळावा. उत्पन्नाची अट दोन लाखावरून वाढवून ती पाच लाख करावी. सन्मान योजनेचा लाभ घेणाऱ्या एखाद्या पत्रकाराचे निधन झाले तर त्याच्या पत्नीला ती हयात असेपर्यंत या योजनेचा लाभ मिळावा. पत्रकार महिला असेल तर तिच्या पश्चात तिच्या पतीला हा लाभ मिळावा. अशा सूचना करण्यात आल्या. याशिवाय शंकराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधीबाबत काही सुधारणासाठी सूचना करण्यात आल्या आहेत. शंकरराव चव्हाण पत्रकार कल्याण मुदत ठेवीतून मिळणाऱ्या व्याजातून ही योजना चालविण्यापेक्षा या योजनेसाठी अर्थसंकल्पात तरतूद केली जावी. त्यामुळे पत्रकारांसाठीच्या योजनांना निधीची कमतरता भासणार नाही .शंकराव चव्हाण निधीचे जे विश्वस्त मंडळ आहे त्यांच्या बैठका नियमित होत नाहीत दर दोन महिन्यांनी या ट्रस्टच्या बैठका झाल्या तर पत्रकारांचे अर्ज प्रलंबित राहणार नाहीत. आरोग्य योजनेचा लाभ देताना ठराविक आजाराची मर्यादा रद्द करून ही योजना सर्व प्रकारच्या आजारासाठी लागू करावी. अनेकदा असे आढळून आले आहे की बऱ्याच पत्रकारांचे मेडिक्लेम असतात अशा पत्रकारांना त्याची सर्व ओरिजनल कागदपत्रे विमा कंपन्यांना द्यावी लागतात. परिणामतः अशा पत्रकारांना योजनेचा लाभ मिळत नाही .अशा पत्रकारांची हॉस्पिटलची झेरॉक्स कागदपत्रे ग्राह्य धरली जावीत आणि महत्त्वाचे म्हणजे या योजनेसाठी असलेली आधिस्वीकृती पत्रिकेची आठ रद्द केली पाहिजे. राज्यात केवळ आठ टक्के पत्रकारांकडेच आधिस्वीकृती असल्याने ९२ टक्के पत्रकार या अटीमुळे योजनेच्या लाभांपासून वंचित राहतात. पत्रकारांच्या मृत्यूनंतर किमान पाच लाख रुपयांची मदत संबंधित पत्रकाराच्या पत्नीला किंवा मुलांना मिळाली पाहिजे. ही रक्कम मृत्यूनंतर एक महिन्याच्या आत तातडीने दिली जावी त्यासाठी देखील आधिस्वीकृती पत्रिकेची अट नसली पाहिजे आमची सरकारला विनंती आहे की या सूचनांचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी ही या निवेदनात करण्यात आली आहे. या निवेदनावर राज्य कार्यकारिणी सदस्य विलास डोळसे, विभागीय संघटक सुभाष चौरे ,विभागीय सचिव रवी उबाळे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळु ंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, जिल्हा कोषाध्यक्ष धनंजय अरबुणे, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हंगे, जिल्हा निमंत्रक दत्ता आंबेकर , जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदिंच्या सह्या आहेत.

# इराणसोबत युद्ध सुरु असताना इस्त्रायलने भारताची माफी का मागितली?

सध्या इस्त्रायलची इराणसोबत लढाई सुरु आहे. मागच्या दोन दिवसात दोन्ही देशांनी परस्परांवर प्रचंड मोठे हल्ले केले आहेत. इस्त्रायलने या ऑपरेशनला रायजिंग लायन नाव दिलं आहे, तर इराणने आपल्या प्रतिहल्ल्याच्या कारवाईला 'ट्रू प्रॉमिस 3' नाव दिलं आहे. हे सगळं इतक्यात थांबणार नसल्याची चिन्ह आहेत. इस्त्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी तसे स्पष्ट संकेत दिले आहेत. इस्त्रायल-इराणमध्ये ही लढाई सुरु असताना इस्त्रायलने भारताची माफी मागितली आहे. इराणसोबत युद्ध लढत असताना भारताची माफी मागण्याच कारण काय? असा प्रश्न तुम्हाला पडू शकतो. इस्त्रायलने भारताचा चुकीचा नकाशा दाखवला




त्या बद्दल माफी मागितली आहे. इस्त्रायलने X वर पोस्ट करुन आपली चूक कबूल केली. "हा नकाशा अचूक भारतीय सीमा दाखवू शकला नाही. आमच्यामुळे जो काही त्रास झाला, त्याबद्दल क्षमा असावी" असं IDF ने पोस्टमध्ये म्हटलय. इस्त्रायलने नकाशाचा फोटो शेअर करताना कॅप्शन दिली होती. "इराण एक जागतिक धोका आहे. आम्ही त्यांचं शेवटच टार्गेट नाही, ही तर सुरुवात आहे. आमच्यासमोर कारवाई करण्याशिवाय पर्याय नाही" असं लिहिलेलं. या नकाशामध्ये इराणला मध्यभागी दाखवण्यात आलं होतं. त्यात इराणच्या मिसाइल्सची 300 किमी, 500 किमी, 800 किमी, 1300 किमी आणि 2000 किलोमीटर अशी मिसाइल्सची रेंज दाखवण्यात आली होती. मध्य पूर्व, उत्तर आफ्रिका, दक्षिण आशिया आणि युरोपचे काही भाग इराणच्या मिसाइलच्या टप्प्यात येत असल्याच दाखवण्यात आलं होतं. इस्त्रायलने काय चूक केलेली? इराणच्या मिसाइल्सपासून फक्त इस्त्रायललाच नाही, तर तो एक जागतिक धोका आहे, असं फोटोच्या माध्यमातून सांगण्याचा प्रयत्न केलेला. पण यात मोठी चूक म्हणजे भारताचा नकाशा चुकीचा दाखवला होता. नकाशातून जम्मू-काश्मीर आणि लडाखला वगळलेलं होतं. हे दोन्ही भाग भारताचे अविभाज्य अंग आहेत. लडाखचा भाग असलेला अकसाई चीनला सुद्धा भारताच्या भागातून वगळण्यात आलं होतं. अरुणाचल प्रदेशला चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आलेलं होतं. या चुकीच्या नकाशासाठी इस्त्रायलने माफी मागितली आहे. Iran is a global threat. Israel is not the end goal, it's only the beginning. We had no other choice but to act. pic. twitter.com/PDEaaixA3c — Israel Defense Forces (@IDF) June 13, 2025 अजून मोठ्या प्रमाणात हल्ले होऊ शकतात इस्त्रायलने गुरुवारी रात्री आणि शुक्रवारी सकाळी इराणच्या अणवस्त्र तळांवर आणि सैन्य ठिकाणांवर हल्ले केले. इराणला अणूबॉम्ब बनवण्यापासून रोखण्यासाठी म्हणून इस्त्रालयने ही कारवाई केली. यात इराणच प्रचंड नुकसान झालं. अणवस्त्र विकासाबरोबर त्यांची बॅलेस्टिक मिसाइल उत्पादनाची क्षमता कमी झाली. त्यांचे बरेच बडे लष्करी अधिकारी मारले गेले. इस्त्रायलचा हा हल्ला म्हणजे इराणसाठी मोठा झटका आहे. त्याला काल रात्री इराणने बॅलेस्टिक मिसाइलद्वारे उत्तर दिलं. पण आता इस्त्रायलकडून इराणवर अजून मोठ्या प्रमाणात हल्ले होऊ शकतात.

## निकाल लागण्याच्या आधीच महाविद्यालयातील तृतीय वर्षातील विद्यार्थी मिडिया या आंतरराष्ट्रीय कंपनी मध्ये रुजू

बीड : या बाबतचे सविस्तर वृत्त असे की, म. शि.प्र.मंडळ संचालित, यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन,बीड हे दर्जेदार शिक्षणा सोबतच विद्यार्थ्यांना नेहमी चांगल्या रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देत असते.त्याचाच एक भाग म्हणून महाविद्यालयाने मायडिया इंडिया प्रा.लि पुण्यशोक अहिल्यानगर ज्याचे मुख्य कार्यालय चीन मध्ये आहे या आंतरराष्ट्रीय कंपनीचे कॉम्पस इंटरव्ह्यू चे आयोजन केले होते.या कंपनीने मेकॅनिकल, इलेक्ट्रिकल व इलेक्ट्रॉनिक शाखेतील ४१ विद्यार्थ्यांची ट्रेनी इंजिनीयर या पदावर निवड केलेली आहे. ज्या विश्वासाने पालक व विद्यार्थी या महाविद्यालयात प्रवेश घेतात तोच विश्वास नेहमी कायम ठेवून आम्ही प्रत्येक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतोय. कॅम्पस मुलाखतीत निवड झालेले विद्यार्थी आज मायडिया इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, अहिल्यानगर येथे रुजू होण्याकरिता कंपनी मार्फत महाविद्यालयात बस पाठवली व विद्यार्थी कंपनीच्या निगराणीखाली येथून रवाना झाले आहेत या विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षी ३.५० लाख इतके पॅकेज मिळणार आहे, त्यामध्ये कॅन्टीन,बस सुविधा पण मिळणार आहे,ही विद्यार्थ्यांसाठी फार मोठी सुवर्ण संधी लाभलेली आहे.यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ.बापूराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी सांगितले की,महाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना चागल्या शिक्षणा बरोबरच चांगल्या कंपनी मध्ये नोकरीची हमी पण महाविद्यालया मार्फत मिळते तसेच आज महाविद्यालयामधील असंख्य विद्यार्थी हे उच्च पदावर व चांगल्या वेतनावर कार्यरत आहेत हि आमच्यासाठी अभिमानाची गोष्ट आहे व विद्यार्थ्यांना चांगला रोजगार मिळवा यासाठी महाविद्यालय हे नेहमी प्रयत्नशील राहणार आहे जो विद्यार्थी प्रवेश घेतो तो महाविद्यालया सोबत कायमचा जोडला जातो आपल्या जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान अद्ययावत व्हावे या दृष्टीने या वर्षीपासून आम्ही बीड जिल्ह्यामध्ये प्रथमच आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड मशीन लॉर्निंग ही नवीन शाखा सुरू केलेली आहे याचा सर्व विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्राचार्य यांनी केले. निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले, महाविद्यालयाचे टी.पी.ओ प्रमुख प्रा. धुमाळ बी.आर सर्व शाखांचे विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या

## सौ. के.एस.के. उर्फ काकू कृषी महाविद्यालयांच्या कृषीकन्यांचे पिंपरगव्हाण गावामध्ये आगमन

बीड प्रतिनिधी ग्रामीण कृषी जागरूकता व कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि विविध उपक्रम घेण्यासाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी अंतर्गत असलेल्या सौ. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर (के.एस.के) उर्फ काकू कृषी महाविद्याल, बीड येथील कृषिकन्यांचे पिंपरगव्हाण गावामध्ये आगमन झाले आहे. यावेळी गावातील सरपंच अशोक आगाम, मंडळ कृषी अधिकारी सोनवणे बी.ए., कृषी अधिकारी पी.एम.नाळवे, कृषी सहाय्यक मीरा बोतरे व ग्रामस्थ उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी संस्थेचे सहसचिव डॉ.जी.व्ही. साळुंखे, प्राचार्य डॉ.एस.पी. मोरे, कार्यक्रम समन्वयक डॉ.एस.टी.शिंदे व महाविद्यालयाच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. इथून पुढे अडीच महिने हे विद्यार्थी या ठिकाणी खरीप हंगामातील विविध पिकांबाबतीत माहिती देणारा असून विविध प्रत्यक्षीके शेतकऱ्यांना करून दाखवणार आहेत. यासोबतच शेतकऱ्यांचे उत्पादन कसे वाढेल यावर चर्चासत्र आणि अंमलबजावणी करणार आहेत. विविध शेतीपूरक व्यवसाय, प्रकल्प, शासकीय योजना यांची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्यात या कृषीकन्यांचा महत्त्वाचा सहभाग असणार आहे. महाविद्यालय प्रशासन नेहमीच विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करून शेतकऱ्यांच्या शाश्वत विकासाकडे सातत्याने लक्ष देत आहे. यावेळी कृषिकन्या चव्हाण असावरी, डोके आरती, परजणे गीताश्री, परजणे वैष्णवी, पवळ साक्षी, उगले सुप्रिया, पवळ उषा व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या कृषिकन्यांचे स्वागत ग्रामपंचायत पदाधिकारी आणि गावकऱ्यांनी केले. यावेळी गावातील शेतकऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला

## घरकुल योजना;जिल्ह्यात गेवराई तालुक्याचे काम सर्वात मागे

बीड ।प्रतिनिधी राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी दिवाळीपर्यंत घरकुलांच्या लाभार्थ्यांची स्वप्नपूर्ती व्हावी, यासाठी कसोशीने प्रयत्न व्हावेत. यासाठी काम करण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी बीड येथील डीपीसीच्या आढावा बैठकीत सूचना दिल्या आहेत. जिल्ह्यात घरकुलाचे काम प्रगतीपथावर असताना जिल्ह्यातील ११ तालुक्यात सर्वात कमी काम गेवराई आणि त्या खालोखाल बीडचे आहे. त्यामुळे गेवराईच्या गटविकास अधिकारी घरकुल योजना राबविण्यासाठी दुर्लक्ष करत असल्याचे दिसून आले. बीड जिल्ह्यात सन २०१६-१७ ते २१-२२ या वर्षात एकूण ३४,२३९ घरकुलापैकी ३१३२ घरकुले पूर्ण करण्यात आली आहे एकूण ९१.५४ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले आहे. तर दुसऱ्या टप्प्यात सन २०२४- २५ मध्ये एकूण ८०, ३३३ दिवाळीपर्यंत ७५, ५०५ घरकुले पूर्ण करण्यात येणार आहेत. आतापर्यंत मराठवाड्यात बीड जिल्हा अव्वलस्थानी आहे. जिल्ह्यात तालुकानिहाय उद्दिष्ट पुढील प्रमाणे देण्यात आले आहे. अंबाजोगाई ७,१७३, आष्टी ९,६११, बीड १२,५४०, धारूर ४,९७९, गेवराई १२,३२६, केज ९, २१०, माजलगाव ७,२९९, परळी ६,२१३, पाटोदा ४२५६, शिरूर (कासार)

## परळीकडून लातूरमार्गे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना घाटनांदूर येथे थांबा द्या ;राजेभाऊ फड यांचे रेल्वे मंत्र्यांना पत्र

परळी वैजनाथ प्रतिनिधी बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ हे देशातील १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असे पाचव्या क्रमांकाचे ज्योतिर्लिंग आहे. दररोज येथे हजारो भाविक दर्शनासाठी येत असतात. त्याचबरोबर परळी वैजनाथ रेल्वे स्थानक हे जिल्ह्यातील सर्वात जुने आणि एकमेव स्थानक असून येथील प्रवासी संघटनांच्या काही प्रमुख मागण्या आहेत. त्या मागण्यांचा सकारात्मक विचार करून मार्गी लावाव्यात यासंदर्भात



राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री तसेच दक्षिण मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक यांना पत्र लिहिले आहे. त्यामध्ये त्यांनी अनेक मागण्या केल्या आहेत. याबाबत अधिक असे की, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्याकडे अनेक रेल्वे प्रवाशांनी विविध समस्या मांडल्या होत्या. त्यांचा पाठपुरावा करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. यासंदर्भात त्यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसेच सिकंदराबाद विभागाचे व्यवस्थापक यांना पत्र लिहून प्रवासी संघटनेच्या मागण्या पोचवल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने म्हटले आहे की, परळी वैजनाथ येथून लातूररोड रेल्वे स्थानकाकडे जाणाऱ्या सर्व रेल्वे गाड्यांना मतदारसंघातील घाटनांदूर येथे थांबा देण्यात यावा. जेणेकरून परळी, अंबाजोगाई तसेच लातूर जिल्ह्यातील अहमदपूर आणि रेणापूर तालुक्यातील प्रवाशांची सोय होणार आहे. याचबरोबर कोरोना महामारीच्या काळात काही रेल्वे गाड्या बंद करण्यात आल्या होत्या, त्यापैकी अमरावती पुणे तसेच काकीनाडा - साईनगर (शिर्डी) या गाड्या नियोजित वेळापत्रकानुसार नियमित सुरू ठेवण्यात याव्यात. वाढती प्रवासी संख्या लक्षात घेता काही गाड्यांच्या डब्यांच्या संख्येत गरजेनुसार वाढ करण्यात यावी, जेणेकरून प्रवाशांची गैरसोय होणार नाही अशा आशयाचे पत्र राजेभाऊ फड यांनी प्रवासी संघटनांच्या आग्रहास्तव केंद्रीय रेल्वे मंत्र्यांना पाठवले आहे.

# आधिस्वीकृती धारक पत्रकारांच्या बस सवलतीसाठी मंत्री सरनाईक यांना निवेदन

बीड/प्रतिनिधी महाराष्ट्रातील सर्व आधी सुकृती धारक पत्रकारांना नवीन आलेल्या इलेक्ट्रॉनिक शिवाई व स्लीपर सेमी स्लीपर कोच मध्ये सवलत मिळावी या मागणीसाठी बीड जिल्हा मराठी पत्रकार परिषदेच्या वतीने परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. बीड जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर यांनी हे निवेदन दिले. यावेळी उपमुख्यमंत्री आरोग्य सुविधा प्रमुख बाजीराव चव्हाण यांची उपस्थिती होती. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांना दिले निवेदनात मराठी पत्रकार परिषदेच्या पदाधिकाऱ्यांनी म्हटले



आहे की महाराष्ट्र शासनाच्या वतीने अधिस्वीकृ तीधारक पत्रकारांना बस प्रवास मोफत दिला जातो. मात्र सध्या महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडे नवीन इलेक्ट्रिक शिवाई बस आलेल्या आहेत. या गाड्यांना पत्रकारांसाठी मोफत बस प्रवास सवलत दिली जात नाही. याशिवाय महामंडळाच्या सेमी-स्लीपर बसलाही सवलत लागू होत नाही. महोदय महाराष्ट्रातील २५% पत्रकारही बस ने प्रवास करीत नाहीत. जे करतात त्यांची अर्थिक अडचण असते अशा पत्रकारांचा सन्मान व्हावा अशी आमची अपेक्षा आहे. एस टी महामंडळाच्या सर्वच गाड्यांना आधिस्वीकृतीधारक पत्रकारांसाठी सुविधा उपलब्ध करून द्यावी अशी आमची विनंती आहे. शिवाई इलेक्ट्रिक गाड्यांना ज्येष्ठ नागरिक, महिला, अपंग यासारख्या सवलती उपलब्ध आहेत. मात्र फक्त पत्रकारांसाठीच या गाड्यांमध्ये मोफत प्रवासाची सवलत नाही. आपण आपल्या स्तरावर संबंधितांना सूचना देऊन महाराष्ट्रातील आधिस्वीकृती धारक पत्रकारांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी मागणी या निवेदनात करण्यात आली आहे .या निवेदनावर विभागीय सचिव रवी उबाळे, विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हा अध्यक्ष विशाल साळुंके, राज्य कार्यकारणी सदस्य विलास डोळसे ,हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा समन्वयक अभिमन्यू घरत , जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, संपादक राजेंद्र होळकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख संजय हांगे, तालुका निमंत्रक मंगेश निटुरकर, समन्वयक लक्ष्मण नरनाळे, तालुका सरचिटणीस प्रचंड सोळंके आदींच्या सह्या आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com